सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ६९ | बुधवार, दि. ३ डिसेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष
३ डिसेंबर

- दुसरा बाजीराव मराठा साम्राज्याचा पेशवा बनला.
- बॉम्बे म्युच्युअल लाइफ अॅश्युरन्स सोसायटी, भारतातील पहिली विमा कंपनी स्थापन झाली.
- जागतिक अपंग दिन.
- अंतराळयानाने मंगळाच्या वातावरणात प्रवेश करण्यापूर्वी काही क्षणांपूर्वी नासाचा मार्स पोलर लँडरशी रेडिओ संपर्क तुटला.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...! जय स्वदेशी...!!

### इंग्लंडचे सरकार रस्त्यांवर चक्क मीठ का टाकते?

पान २ वर..

### श्रीदत्त जयंती विशेष



पान ४ वर...

# उत्सव लोकशाहीचा...! लगबग मतदारांची...!!




(छायाचित्रे : रजनीकांत पाटील)

# पालिका निवडणुकीसाठी मतदारांचा प्रचंड उत्साह!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- येथील पालिकेची तब्बल नऊ वर्षांनंतर निवडणूक झाल्याने मंगळवार, दि. २ डिसेंबर रोजी झालेल्या मतदानासाठी सकाळपासून मतदारांचा उत्साह दिसून आला. सकाळी थंडी असल्याने मतदान केंद्रांवर तुरळक गर्दी होती. मात्र, ११ वाजेनंतर मतदान केंद्रांवर हळूहळू गर्दी वाढू लागली. दुपारी तीन वाजेनंतर शहरातील विविध मतदान केंद्रांवर मतदारांच्या रांगा लागल्या होत्या. साडेचार ते साडेपाच वाजेच्या सुमारास जवळपास सर्वच केंद्रांवर मतदारांची चांगलीच गर्दी उसळली होती. अनेक केंद्रांवर रात्री साडेआठ वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया सुरू होती.

सकाळपासूनच सर्वच उमेदवारांनी

## अनेक केंद्रांवर रात्री उशिरापर्यंत सुरू होते मतदान

मतदारांना मतदान केंद्रांवर आणण्यासाठी वाहनांची व्यवस्था केली होती. उमेदवारांचे समर्थक कार्यकर्ते जास्तीत जास्त मतदान कसे होईल, यासाठी धावपळ करीत होते. मतदारांसाठी चहा, नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली होती. मतदान झाल्यानंतर मतदारांना घरापर्यंत सोडण्याची व्यवस्था उमेदवारांनी केली होती. मतदानाच्या पूर्वसंध्येला वाढीव लक्ष्मी दर्शन झाल्याने मतदारांचा मतदानासाठी कमालीचा उत्साह दिसून आला. मतदान केंद्रांच्या बाहेर बुथ लावण्यात आले होते. मतदान असलेल्या ठिकाणचे यादी क्रमांक व खोली क्रमांक घेण्यासाठी मतदार गर्दी करीत होते. विविध पक्ष, आघाडी व अपक्ष उमेदवारांचे कार्यकर्ते मतदारांना चिठ्ठ्या लिहून मतदानासंबंधी माहिती देत होते. उमेदवार, त्यांचे नातेवाईक व कार्यकर्ते मतदारांना हात जोडून मतदानाचे आवाहन करीत होते.

सकाळी साडे सात वाजेपासून दुपारी साडेतीन वाजेपर्यंत ८९ हजार ७५१ मतदारांपैकी ३९ हजार ९४६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजाविला. ४४. ५१ टक्के मतदान झाले होते. निर्धारीत वेळेच्या आत आलेल्या मतदारांसाठी ताडेपुरा, अमलेश्वर नगर, आर. के. नगर व गांधली पुरा येथील मतदान केंद्रांवर सुमारे साडे आठ वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया सुरू होती.

# 'लक्ष्मी' दर्शनाचे अनेकांचे भंगले स्वप्न...!

## जुन्या प्रभागात नाव अन् नव्या घरात स्थलांतरीत झाल्याचा परिणाम...!!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



यंदा पालिकेच्या निवडणुकीत मतदारांचा चांगलाच उत्साह दिसुन आला. मोठ्या प्रमाणात 'लक्ष्मी दर्शन' झाल्याने मतदारांच्या केंद्रांवर लांबच लांब रांगा दिसून आल्या. मात्र, अनेक मतदारांची तारांबळही उडाली. याचे कारण म्हणजे अनेक मतदार स्थलांतरीत होऊन नव्या घरांमध्ये स्थायिक झाले आहेत. त्यांची नावे जुन्या प्रभागात असल्याने त्यांना लक्ष्मी दर्शन होऊ शकले नाही. ' वाटप ' करणाऱ्यांनीही त्यांचा रहिवास नसल्याने त्यांच्यावर अविश्वास दाखवत त्यांना वंचित ठेवल्याची खंत एका मतदाराने नाव न सांगण्याच्या अटीवर बोलून दाखविली. अशा प्रकारचे लक्ष्मी दर्शनाचे स्वप्न भंगलेले अनेक मतदार आहेत.

अनेक मतदार हे त्यांच्या जुन्या प्रभागात जाऊन तासन् तास बसून होते. मात्र, त्यांना लक्ष्मी दर्शन न झाल्याने त्यांना निराश होऊन परतावे लागले. अनेक महिलांनीही रात्री उशिरापर्यंत जुन्या प्रभागात थांबून लक्ष्मीच्या फेरीची वाट पाहिली. कधी लक्ष्मी येते या आशेने रात्रभर डोळ्यात तेल टाकून सकाळपर्यंत बसूनही दर्शन न झाल्याने त्यांच्यात नाराजी दिसली. याचा थेट परिणाम मतदानावरही जाणवला. काही महिलांनी सांगितले, की लक्ष्मी दर्शनच झाले नाही, त्यामुळे आम्ही कुणाला मतदान करायचे? निराश असलेल्या काही महिला लक्ष्मी दर्शन होईल, आशेने मतदान केंद्रापर्यंत येऊनही तासभर थांबून मतदान न करता निघून गेल्याचे निदर्शनास आले. मतदान केंद्रांवर यांची चर्चाही चांगलीच रंगली होती.

प्रभाग बदल, स्थलांतराची नोंद न होणे, मतदार यादीतील विसंगती, आणि लक्ष्मी दर्शनाच्या फेऱ्यात झालेली ढिलाई या साऱ्या कारणांचा फटकाही कोणत्या उमेदवाराला बसेल, हे सांगता येत नाही.



# उशिर झाल्याने अनेक मतदार मतदानापासून वंचित!

## शेवटच्या मिनिटांपर्यंतची धावपळ ठरली व्यर्थ!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर- येथील पालिका निवडणुकीसाठी दिवसभर मतदारांमध्ये उत्साह दिसून आला. मात्र, सायंकाळी साडे पाच वाजेपर्यंत मतदान करण्याची अंतीम वेळ होती. मतदान केंद्राचे गेट बंद होण्याच्या आत जेवढे मतदार केंद्राच्या आत होते, त्यांनाच मतदानाचा हक्क बजाविता आला. मात्र, अनेक मतदारांना रितसर लक्ष्मी दर्शन न झाल्याने लक्ष्मीची वाट पाहात राहिल्याने, तर काहींना मिळालेल्या लक्ष्मीत अजून वाढ होईल या अंदाजमय प्रतिक्षेमुळे मतदान केंद्रावर पोहोचण्यास उशिर झाल्याने त्यांनी शेवटच्या मिनिटापर्यंत केलेली धावपळ व्यर्थ ठरली. त्यामुळे त्यांना मतदान करता आले नाही. तर अशा मतदारांना उमेदवारांनी वाटप केलेली लक्ष्मी व्यर्थ ठरली. काही उमेदवारांनी अशा मतदारांकडून दिलेले पाकिट शक्तीचा वापर करून परत घेतल्याचे तसेच त्यावरून जाहीररित्या शिविगाळ आणि गच्ची धराधरी झाल्याचे कळते.

ठरलेल्या वेळेनुसार केंद्र अधिकाऱ्यांनी मतदान केंद्रांचे गेट तत्काळ बंद केले . त्यामुळे उशिरा पोहोचलेल्या नागरिकांची एकच धावपळ उडाली. अनेक मतदार पळ- पळत केंद्राजवळ येताना दिसून आले. एका मिनिटाच्या फरकाने गेटपर्यंत पोहोचले. मात्र, वेळ संपली आहे, आत घेऊ शकत नाही, असा स्पष्ट शब्दात अधिकाऱ्यांनी त्यांना नकार दिला. फक्त काही पावलेच आम्ही दूर होतो. मात्र, गेट बंद झाले आणि मतदानाच्या हक्कापासून वंचित राहिलो, अशी खंत अनेक मतदारांनी व्यक्त केली. केंद्र अधिकारी आपल्याला आत घेतील या, आशेने काही जण थांबूनही होते, मात्र त्यांची निराशा झाली.



# इंग्लंडचे सरकार रस्त्यांवर चक्क मीठ का टाकते ?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

प्रत्येक वर्षी हिवाळा सुरू होताच इंग्लंडमध्ये तापमान झपाट्याने खाली जाते. त्यामुळे अनेक भागात थंडी इतकी तीव्र होते की तापमान शून्य अंश सेल्सिअसच्या खाली तापमान घसरते. अशा स्थितीत रस्त्यांवर बर्फ आणि बर्फामुळे तयार झालेला पातळ बर्फाचा थर तयार होतो. हा बर्फ डोळ्यांना दिसत नाही. मात्र अत्यंत घसरडा असतो. त्यामुळे वाहने सहज घसरू शकतात. हीच कारणे आहेत, की इंग्लंड सरकार आणि स्थानिक प्रशासन दरवर्षी लाखो टन मीठ रस्त्यांवर पसरवते.

**बर्फ का धोकादायक असतो ?**

- हिवाळ्यात रस्त्यांवर जमणारा बर्फ.
- अतिशय घसरडा असतो.
- वाहनांचे ब्रेक नीट लागत नाहीत.
- वाहने नियंत्रण गमावून घसरतात.
- पादचाऱ्यांनाही चालताना घसरण्याचा मोठा धोका असतो.
- पातळ बर्फामुळे अपघात मोठ्या प्रमाणात होतात. कारण तो दिसतही नाही.
- जर सरकारने काहीच उपाययोजना केली नाही, तर रोजच्या वाहतुकीवर मोठा परिणाम होईल. अपघातांची संख्या प्रचंड वाढेल.

**बर्फावर मीठ का टाकले जाते ?**
(विज्ञानासह स्पष्टीकरण)

- मीठाचा मुख्य उपयोग म्हणजे पाण्याचा गोठण्याचा बिंदू कमी करणे.
- साधे पाणी शून्य अंश सेल्सिअस तापमानात गोठते.

जेव्हा पाण्यात मीठ मिसळते तेव्हा गोठण्याचा बिंदू शून्य अंश सेल्सिअस तापमानापेक्षा खाली जातो. त्यामुळे पाणी आणि बर्फ सहज गोठत नाही.
अर्धा वितळलेला बर्फ तयार होऊन बर्फ वितळण्यास सुरूवात होते. या प्रक्रियेला अतिशीत बिंदू उदासीनता म्हणतात.
त्यामुळे मीठ टाकल्याने आधीचा बर्फ वितळतो.
नवीन बर्फ जमण्याचा वेग कमी होतो.



रस्ता सुकतो आणि घसरत नाही. यालाच इंग्लंडमध्ये ग्रिटिंग म्हणतात.

**सरकारला हे आगाऊ का करावे लागते ?**

- जर बर्फ आधीच जाड थराने जमला तर ट्रकना मीठ टाकणे खूप अवघड होते.
- मीठ काम करायला बराच वेळ लागतो.
- महामार्ग बंद करावे लागतात.
- बस, ट्रेन, ॲम्ब्युलन्ससारख्या सेवा थांबू शकतात.

म्हणूनच हवामान विभाग जेव्हा बर्फ किंवा गोठवणाऱ्या थंडीचा इशारा देतो तेव्हा सरकार आधीच रस्त्यांवर मीठ पसरवते. ही अगदी प्रतिबंधक उपाययोजना आहे.

**इंग्लंडमध्ये ग्रिटिंग कसे केले जाते ?**

- इंग्लंडमध्ये स्थानिक परिषदांकडे खास दळणाची वाहने असतात. हे मोठे ट्रक असतात जे रस्त्यावर पसरविण्यासाठी खडबडीत मीठगिट्टीचे मिश्रण टाकतात.
- गरजेप्रमाणे लाखो टन मीठ साठवून ठेवतात.
- ज्या रस्त्यांवर जास्त वाहतूक असते तेथे सर्वांत आधी मीठ टाकतात.
- रात्री उशिरा किंवा सकाळी सूर्य उगवण्यापूर्वी ग्रिटिंग करतात.
- मोटारवे, ए दर्जाचे रस्ते, हॉस्पिटल मार्ग, बस मार्ग यांना सर्वाधिक प्राधान्य दिले जाते.

**दरवर्षी किती मीठ वापरले जाते ?**

- इंग्लंडमध्ये दर हिवाळ्यात लाखो टन मीठ रस्त्यांवर टाकले जाते.
- थंडी जास्त असेल तर वापर वाढतो.
- देशभरात शेकडो मीठ साठवण डेपो तयार ठेवले जातात.
- ही प्रक्रिया महाग असली तरी अपघात, रस्ते बंद होणे आणि वाहतूक विस्कळीत होणे टाळण्यासाठी अत्यावश्यक आहे.

**मीठ टाकल्याचे फायदे**

- रस्ते घसरत नाहीत.
- अपघात कमी होतात.
- बस, ट्रेन, ॲम्ब्युलन्स सेवांना अडथळा येत नाही.
- लोकांना कामावर, शाळेत, हॉस्पिटलमध्ये जाणे सोपे होते.
- आपत्कालीन सेवा वेळेवर पोहोचतात.
- महामार्ग बंद पडत नाहीत.
- ही प्रक्रिया नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी अत्यंत महत्त्वाची आहे.

**मीठाच्या मर्यादा**

- तापमान खूपच कमी (१० अंश सेल्सिअस ते १५ अंश सेल्सिअस) झाल्यास मीठ नीट काम करत नाही.
- बर्फ सतत पडत राहिला तर ग्रिटिंग पुन्हा पुन्हा करावे लागते.
- ज्या दुर्गम ठिकाणी वाहतूक कमी असते तेथे ग्रिटिंग उशिरा होते.
- तरीही उपलब्ध वैज्ञानिक पर्यायांपैकी मीठ सर्वांत प्रभावी उपाय मानला जातो.

# महाराष्ट्रात पहिल्यांदाच!



## तृतीयपंथी व्यक्तीने मिळविला महापालिकेत विजय, झाली नगरसेविका

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

महाराष्ट्रात तृतीयपंथी व्यक्तींसाठी एक नवा अध्याय सुरू झाला आहे. कोल्हापूरमधील एका तृतीयपंथी व्यक्तीने महाराष्ट्रात पहिल्यांदाच नगरसेवक पद मिळविले आहे, जे इतर तृतीयपंथीय व्यक्तींना अद्याप साध्य झाले नाही. ही घटना सामाजिक समावेशकतेचे आणि लैंगिक अल्पसंख्याकांच्या राजकीय प्रतिनिधित्वाचे प्रतीक ठरली आहे. या यशामुळे कोल्हापूर शहर आणि महाराष्ट्र राज्य स्तरावर चर्चा सुरू झाली आहे.

**पार्श्वभूमी आणि संघर्ष**

तृतीयपंथी व्यक्तींना समाजात अनेक आव्हाने सामोरे जावे लागतात. ज्यात सामाजिक भेदभाव, आर्थिक अडचणी आणि राजकीय संधींचा अभाव यांचा समावेश आहे. महाराष्ट्रात तृतीयपंथी व्यक्तींना ओळखपत्र आणि कायदेशीर हक्क मिळाले असले, तरी निवडणुकीत उभे राहणे किंवा जिंकणे ही मोठी खरी साध्य करण्यासारखी गोष्ट आहे. कोल्हापूरमधील ही व्यक्ती, ज्यांचे नाव अद्याप अधिकृतपणे जाहीर झाले नाही. त्यांनी स्थानिक निवडणुकीत भाग घेतला. मतदारांच्या विश्वासाने विजयी झाल्या. या यशामागे त्यांचा कठोर संघर्ष, सामाजिक कार्य आणि समुदायाच्या समर्थनाचा मोठा वाटा आहे.

**महाराष्ट्रातील पहिली घटना**

महाराष्ट्रात तृतीयपंथी व्यक्तीने नगरसेवक पद मिळवले ही पहिलीच वेळ आहे. यापूर्वी, राज्यात तृतीयपंथी व्यक्तींनी सामाजिक कार्य किंवा कायदेशीर लढाई लढल्या असल्या, तरी राजकीय पातळीवर असे प्रतिनिधित्व दुर्मीळ आहे. कोल्हापूर महानगरपालिका निवडणुकीत ही व्यक्ती विजयी झाल्याने तृतीयपंथी समुदायाला राजकीय आवाज मिळाला आहे. हे यश महाराष्ट्र सरकारच्या लैंगिक अल्पसंख्याकांसाठीच्या धोरणांचे सकारात्मक परिणाम दर्शवते, ज्यात आरक्षण आणि समान संधींचा समावेश आहे.

**समाजिक प्रभाव**

या घटनेने तृतीयपंथी व्यक्तींसाठी नवीन आशा निर्माण केली आहे. कोल्हापूरसारख्या सांस्कृतिकदृष्ट्या श्रीमंत शहरात अशी विजय सामाजिक बदलाचे संकेत देतात. विजयी व्यक्तीने आता समुदायाच्या समस्या, जसे की आरोग्य सुविधा, शिक्षण आणि भेदभावविरोधी कायद्यांची अंमलबजावणी, यावर लक्ष केंद्रित करण्याची घोषणा केली आहे. हे यश इतर जिल्ह्यांतील तृतीयपंथी व्यक्तींसाठी प्रेरणास्रोत ठरेल आणि महाराष्ट्रात लैंगिक समानतेच्या दिशेने पाऊल आहे.

**भविष्यातील अपेक्षा**

या ऐतिहासिक यशामुळे महाराष्ट्र सरकारला तृतीयपंथी व्यक्तींसाठी अधिक पाठबळ देण्याची गरज निर्माण झाली आहे. स्थानिक पातळीवरून सुरू झालेला हा प्रवास राज्य आणि राष्ट्रीय राजकारणापर्यंत पोहोचू शकतो. कोल्हापूरमधील ही घटना सामाजिक न्याय आणि समावेशकतेचे उदाहरण ठरली आहे. ज्यामुळे इतर अल्पसंख्याक गटांना प्रोत्साहन मिळेल.

# अमिताभ बच्चन यांचा मराठीशी संबंध : ‘ आक्का ’ चित्रपटापासून ते सांस्कृतिक योगदानापर्यंत

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

बॉलीवूडचे शहेनशाह अमिताभ बच्चन यांचा ११ ऑक्टोबर रोजी वाढदिवस साजरा झाला. गेल्या अनेक दशकांपासून हिंदी चित्रपटसृष्टीत आपल्या दमदार अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या बिग बी यांचे जगभरात कोट्यवधी चाहते आहेत. त्यांच्या चित्रपटांनी प्रेक्षकांना हसवले, रडवले आणि प्रेरणा दिली. वयाची ८२ वर्षे उलटली, तरीही अमिताभ आजही अविरत उत्साहाने काम करत आहेत. विशेष म्हणजे त्यांनी मराठी चित्रपटसृष्टीतही आपली छाप सोडली आहे. त्यांच्या मराठी चित्रपटाविषयी आणि मराठीशी असलेल्या नात्याबद्दल चित्रपट विश्लेषक दिलीप ठाकूर यांनी काही खास आठवणी सांगितल्या आहेत.




**अमिताभ यांचा मराठी चित्रपट : ‘ आक्का ’**
अमिताभ बच्चन यांनी १९९४ मध्ये प्रदर्शित झालेल्या ‘ आक्का ’ या मराठी चित्रपटात काम केले. या चित्रपटाची निर्मिती त्यांचे मेकअप आर्टिस्ट दीपक सावंत यांनी केली, तर दिग्दर्शन श्रीधर जोशी यांचे होते. या चित्रपटात अमिताभ आणि जया बच्चन यांच्यावर चित्रीत झालेले ‘ तू जगती अधिपती, नमन तुला प्रथम श्री गणपती ’ हे गणपती आरती गीत विशेष उल्लेखनीय आहे. या गीताचे चित्रीकरण मुंबईतील दादासाहेब फाळके चित्रनगरीतील मंदिरात झाले.

**मराठी चित्रपटसृष्टीशी पहिली भेट**

अमिताभ यांचा मराठी चित्रपटसृष्टीशी पहिला संबंध १९९१ मध्ये आला. जेव्हा निर्माते सतीश कुलकर्णी यांनी त्यांच्या तुलसी प्रॉडक्शन्स निर्मित आणि सचिन पिळगावकर दिग्दर्शित ‘ एकापेक्षा एक ’ या मराठी चित्रपटाच्या यशस्वी ज्युबिली सोहळ्यासाठी अमिताभ यांना आमंत्रित केले. सतीश कुलकर्णी यांनी अमिताभ यांचे तत्कालीन सेक्रेटरी शीतल जैन यांच्याशी संपर्क साधून त्यांचा होकार मिळविला. जुहू येथील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये झालेल्या या सोहळ्यात अमिताभ यांनी शाल परिधान करून उपस्थिती लावली. त्याच दिवशी त्यांचा हिंदी चित्रपट ‘ हम ’ (दिग्दर्शक : मुकुल आनंद) प्रदर्शित झाला होता. अमिताभ यांच्या उपस्थितीमुळे ‘ एकापेक्षा एक ’च्या यशाला आणखी बळ मिळाले.

**मराठी सांस्कृतिक योगदान**

**अमिताभ यांचे मराठीशी नाते केवळ चित्रपटापुरते मर्यादित नाही. २०१५ मध्ये राजकमल कला मंदिरच्या चित्रपती व्ही. शांताराम फाऊंडेशनने प्रकाशित केलेल्या शतक महोत्सवी मराठी चित्रपट (३ मे १९१३ ते ३ मे २०१३) या संदर्भ सूचीचे प्रकाशन अमिताभ यांच्या हस्ते विलेपार्ले येथील दीनानाथ मंगेशकर नाट्यगृहात झाले. या सोहळ्यात अमिताभ यांनी उत्तम मराठीत केलेले भाषण मराठी वृत्तवाहिन्यांवर थेट प्रक्षेपित झाले. त्याची चित्रपटसृष्टी, चाहते आणि प्रसारमाध्यमांमध्ये खूप चर्चा झाली.**



**मराठी चित्रपटांच्या ट्रेलर प्रकाशन**

अमिताभ यांनी ‘ मी सिंधुताई सपकाळ ’ आणि ‘ ढोलकी ’ या मराठी चित्रपटांच्या ट्रेलरचे शानदार सोहळ्यात प्रकाशन केले. ‘ ढोलकी ’च्या सोहळ्यात अभिनेता सिद्धार्थ जाधव अमिताभ यांच्या भेटीने कमालीचा उत्साहित झाला होता, ही आठवणही विशेष आहे. अमिताभ बच्चन यांचा मराठी चित्रपटसृष्टी आणि संस्कृतीशी असलेला संबंध त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचा एक महत्त्वाचा पैलू आहे. ‘ आक्का ’ चित्रपटापासून ते मराठी सांस्कृतिक सोहळ्यांपर्यंत त्यांनी मराठी प्रेक्षकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले आहे.

## पुण्यातील खेडेगावात बीएएपी आयटी कंपनी;

# सहाशे तरुणांना लाखोंच्या पगाराची नोकरी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

पुण्याजवळील एका खेडेगावात रावसाहेब घुगे यांनी अमेरिकेतील उच्च पगाराची नोकरी सोडून ‘ बीएएपी ’ (बिझनेस ॲप्लिकेशन ॲण्ड प्लॅटफॉर्म्स) नावाची आयटी कंपनी स्थापन केली. यामुळे गावातील शेतकऱ्यांच्या मुलांना गावातच लाखो रुपयांच्या पगाराच्या नोकऱ्या मिळाल्या आहेत.
अहिल्यानगर येथील फोंडा माळरानावर स्थापन झालेल्या या कंपनीने जवळच्या गावातील तरुणांना प्राधान्य दिले आहे. कोरोना काळात गावी परतलेल्या रावसाहेब यांनी गावाच्या विकासासाठी संकल्प केला आणि ही कंपनी सुरू केली. त्यांनी शेतकऱ्यांच्या मुलांसाठी विशेष एआय मॉडेल विकसित केले. ज्यामुळे शिक्षण व्यवस्था सुधारली आणि विद्यार्थ्यांना प्रश्नांची त्वरित उत्तरे मिळू लागली. तसेच गावात आयटी प्रशिक्षण केंद्र स्थापन करून कोडिंग आणि इतर आयटी कौशल्ये शिकविली जातात.
आतापर्यंत ६०० हून अधिक तरुणांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. त्यापैकी १२० हून अधिक जणांना नोकऱ्या मिळाल्या आहेत. पुण्यातील काही कंपन्या या उपक्रमाशी सहकार्य करण्यास उत्सुक आहेत. या कंपनीचा मुख्य उद्देश ग्रामीण तरुणांना शहरांकडे स्थलांतरित होण्यापासून रोखणे आणि त्यांना गावातच आयटी क्षेत्रात काम करण्याची संधी उपलब्ध करून देणे हा आहे.

**१) अमेरिकेच्या टॅरिफ धोरणाचा आयटी क्षेत्रावर काय परिणाम झाला ?**

अमेरिकेच्या टेरिफ धोरणामुळे जागतिक आयटी क्षेत्रात अनेकांनी नोकऱ्या गमावल्या. यामुळे ग्रामीण भागात स्थानिक संधी निर्माण करण्याची गरज वाढली. ज्याचे उदाहरण पुण्याजवळील या आयटी कंपनीने दिले आहे.

**२) रावसाहेब घुगे यांनी आयटी कंपनी का आणि कशी सुरू केली ?**

उच्च शिक्षणानंतर अमेरिकेत आयटी नोकरी करणारे रावसाहेब घुगे कोरोना काळात गावी परतले. गावाच्या विकासासाठी त्यांनी अहिल्यानगर येथे फोंडा माळरानावर बीएएपी आयटी कंपनी सुरू केली. ज्यामुळे शेतकऱ्यांच्या मुलांना गावातच चांगल्या नोकऱ्या मिळत आहेत.

**३) बीएएपी कंपनी काय आहे आणि तिचा उद्देश काय ?**

बीएएपी (बिझनेस ॲप्लिकेशन ॲण्ड प्लॅटफॉर्म्स) ही अहिल्यानगर येथील आयटी कंपनी आहे. जी शेतकऱ्यांच्या मुलांना प्राधान्य देते. याचा उद्देश ग्रामीण तरुणांना गावातच आयटी क्षेत्रात संधी देऊन स्थलांतर रोखणे आहे.

# पिता के सपने के लिए छोड़ा विदेश, दूसरे प्रयास में यूपीएससी में ९५ वीं रैंक हासिल कर बनीं आयपीएस



**सक्सेस स्टोरी...!**

ग्लोबलमहातेज वृत्तसेवा

यूपीएससी, देश की सबसे कठिन परीक्षाओं में से एक, को पास करना आसान नहीं। लेकिन सृष्टि मिश्रा ने पिता के सपने को पूरा करने के लिए कड़ी मेहनत और दृढ़ संकल्प के साथ यह उपलब्धि हासिल की। २०२३ बैच की आयपीएस अधिकारी सृष्टि ने अपने दूसरे प्रयास में ऑल इंडिया ९५ वीं रैंक प्राप्त की।

**विदेश से पढ़ाई, भारत में यूपीएससी की तैयारी**

सृष्टि के पिता, जो मिनिस्ट्री ऑफ एक्सटर्नल अफेयर्स में अंडर सेक्रेटरी हैं, की पोस्टिंग साउथ अफ्रीका में हुई थी। सृष्टि ने वहीं अपनी पढ़ाई पूरी की। परिवार में शिक्षा को हमेशा महत्व दिया गया, और पिता के मार्गदर्शन ने सृष्टि को यूपीएससी की तैयारी के लिए प्रेरित किया। अपनी मां, जो एक गृहिणी हैं, और परिवार के समर्थन से सृष्टि ने भारत लौटकर इस कठिन परीक्षा की तैयारी शुरू की।

**पहले प्रयास में असफलता, फिर मेहनत से सफलता**

पहले प्रयास में असफलता मिलने पर सृष्टि निराश हुईं, लेकिन उन्होंने हार नहीं मानी। दिन-रात मेहनत और आत्मविश्वास के साथ उन्होंने कमियों को सुधारा और दूसरे प्रयास में यूपीएससी क्रैक कर लिया। उनकी ९५ वीं रैंक उनकी लगन और परिवार के समर्थन का परिणाम है। सृष्टि की कहानी उन युवाओं के लिए प्रेरणा है, जो असफलता के बाद भी अपने लक्ष्य को हासिल करने का सपना देखते हैं।

# मुंग्यांची अजब-गजब दुनिया

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

शास्त्रज्ञांनी असे शोधून काढले आहे, की मुंग्या धान्य व बियाणे हिवाळ्यासाठी साठवून ठेवताना ते साठविण्यासाठी बिया अर्ध्या भागात फोडतात. कारण बिया अर्ध्या भागात फोडल्या, की अगदी योग्य परिस्थिती असली तरी त्या अंकुरत नाहीत. पण शास्त्रज्ञ आश्चर्यचकित झाले. जेव्हा त्यांनी शोधले, की मुंग्यांच्या वारुळामध्ये साठवलेल्या कोथिंबीरीच्या बिया मात्र नेहमी दोन नव्हे, तर चार भागांत फोडलेल्या असतात. पुढे प्रयोगशाळेत संशोधन केल्यानंतर असे लक्षात आले, की कोथिंबीरीचे बी हे असे एकमेव बी आहे जे दोन भागांमध्ये विभागले तरी अंकुरते. पण चार भाग केले असता ते कधीही अंकुरत नाही.

आता प्रश्न असा- एवढ्या छोट्या-छोट्या जीवांना हे सगळे कसे माहीत असते ? आणि आपण माणसे स्वतःला देवाची एकमेव बुद्धिवान निर्मिती मानतो! खरी गोष्ट अशी आहे, की आपण खूप थोडे जाणतो आणि अगदी लहानशा जीवापासूनही शिकण्यासारखे खूप काही आहे. देव खरोखरच महान व निष्पक्ष आहे.



© 2009 Encyclopædia Britannica, Inc.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# ‘मी थकलोय सर, टार्गेट पूर्ण करू शकलो नाही...’, असे म्हणत बीएलओची आत्महत्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गेल्या काही आठवड्यात अनेक बीएलओंनी आत्महत्या केल्याचे वृत्त आहे. त्यांनी जास्त कामाचा ताण आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून येणाऱ्या दबावाला जबाबदार धरले आहे. उत्तर प्रदेशातील मुरादाबाद येथील एका ४६ वर्षीय बूथ लेव्हल ऑफिसर (बीएलओ) ने त्याच्या घरी आत्महत्या केल्याचा आरोप आहे.

मतदार यादीच्या चालू असलेल्या पुनरावृत्ती (एसआयआर) संबंधित कामाच्या दबावामुळे त्याने हे टोकाचे पाऊल उचलल्याचे पोलिसांनी सांगितले. पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, केरळ, छत्तीसगड, गोवा, गुजरात, मध्य प्रदेश, राजस्थान आणि तामिळनाडूसह १२ राज्यांमध्ये मतदार यादी पुर्ननिरीक्षण सुरू असताना या घटनांमुळे राजकीय वादळ निर्माण झाले आहे. सर्वेश सिंग असे पीडित व्यक्तीचे नाव आहे. तो एका शाळेत सहाय्यक शिक्षक होता आणि त्याला ७ ऑक्टोबर रोजी बीएलओ पदावर नियुक्त करण्यात आले होते. ही त्याची निवडणुकीतील पहिलीच

## तीन पानांच्या सुसाईड नोटमध्ये काय लिहिले?



नियुक्ती होती. बीएलओ हे जनतेसाठी प्राथमिक संपर्क बिंदू आहेत. जे त्यांना निवडणुकीशी संबंधित फॉर्म भरण्यास आणि त्यांची माहिती नियुक्त केलेल्या डेटाबेसमध्ये अपलोड करण्यास मदत करतात.
आत्महत्येपूर्वी रेकॉर्ड केलेला सिंगचा एक व्हिडिओ आता सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. त्यामध्ये तो अधिकारी खूप दुःखी दिसतो आहे. कठोर परिश्रम करूनही तो त्याचे काम पूर्ण करू शकला नाही, याबद्दल तो सांगत आहे. व्हिडिओमध्ये तो त्याच्या आई आणि बहिणीची माफी मागतो आणि त्यांना त्याच्या लहान मुलींची काळजी घेण्याची विनंती करतो. या व्हिडिओमध्ये सिंग रडताना दिसत आहे. “आई, कृपया माझ्या मुलींची काळजी घ्या. कृपया मला माफ करा. मी काम पूर्ण करू शकलो नाही. मी एक कठोर पाऊल उचलणार आहे.” असे त्याने म्हटले आहे. त्याच्या निर्णयासाठी कोणालाही दोषी ठरवू नये आणि कुटुंबाला याबद्दल काहीही प्रश्न विचारू नये किंवा विचारू नये असे आवाहनही केले आहे. “ मी खूप अस्वस्थ आहे. गेल्या २० दिवसांपासून मला झोप येत नाहीये. माझ्या चार लहान मुली आहेत. इतर काम पूर्ण करू शकतात, पण मी करू शकत नाही.” त्याच्या बहिणीशी बोलताना तो जड अंतःकरणाने म्हणाला, “मी हे जग सोडून जात आहे. माफ करा, बहिणी. माझ्या अनुपस्थितीत, कृपया माझ्या मुलांची काळजी घ्या.” अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, त्यांची पत्नी बबली देवी हिला त्यांचा मुलगा त्यांच्या घराच्या स्टोरेज रूममध्ये लटकलेला आढळला. यावेळी त्यांनी ताबडतोब स्थानिक पोलीसांना कळविले. घटनास्थळी जिल्हा मूलभूत शिक्षण अधिकाऱ्यांना उद्देशून लिहिलेली दोन पानांची एक हस्तलिखित सुसाईड नोट सापडली. या चिठ्ठीत, सिंग यांनी निर्धारित वेळेत एसआयआरचे लक्ष्य पूर्ण करू न शकल्याबद्दल दुःख व्यक्त केले. त्या चिठ्ठीत लिहिले होते, की “ मी रात्रंदिवस काम करत आहे, पण मी माझे लक्ष्य पूर्ण करू शकत नाही, साहेब. माझ्या रात्री काळजीने असह्य होतात. मी दोन ते तीन तासच झोपतो. मला चार मुली आहेत, त्यापैकी दोन मुलींची तब्येत ठीक नाही. कृपया मला माफ करा. “वरिष्ठ पोलीस अधिकारी आशिष प्रताप सिंह यांनी सुसाईड नोटमधील मजकुराची पुष्टी केली आणि म्हणाले, “ बीएलओ कर्तव्यांचा भार तो पेलण्यास असमर्थ असल्याचे चिठ्ठीत म्हटले आहे. पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.”

# बेंगळुरूत ७ कोटींचा फिल्मी स्टाईल दरोडा

## पोलिसांनी अशी केली तिघांना अटक?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रिझर्व्ह बँकेचे अधिकारी असल्याचे सांगत बँकेची रोख रक्कम घेऊन जाणारे वाहन (कॅश व्हॅन) लुटल्याच्या प्रकरणाचा गुंता पोलिसांनी सोडवला आहे. ७ कोटींच्या दरोडा प्रकरणात तीन संशयितांना अटक केल्याचे बेंगळुरू पोलिसांनी सांगितले. तसेच गुन्ह्याची उकल करत ५.७६ कोटी रुपये जप्त करण्यात आले आहेत, असे पोलिसांनी सांगितले. उर्वरित रक्कम आणि आणखी पाच जणांना लवकरच ताब्यात घेतले जाईल, असे बेंगळुरूचे पोलीस आयुक्त सीमांत कुमार सिंह यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. अटक केलेल्या तिघांपैकी गोपाल प्रसाद वाहनाचा सुरक्षा रक्षक होता. तर झेवियरने आधी कॅश मॅनेजमेंट सर्व्हिसेस (सीएमएस) मध्ये काम केलेले होते आणि अन्नप्पा नाईक बेंगळुरूच्या पश्चिम उपनगरातील एका पोलीस ठाण्यात तैनात होता. पोलिसांनी हा गुंता सोडवण्यासाठी कर्नाटक, केरळ, तामिळनाडू, तेलंगणा, आंध्र प्रदेश आणि गोवा यासह दक्षिण भारतातील सर्व राज्यांमध्ये आपले २०० अधिकारी आणि कर्मचारी तैनात केले होते. आरोपींनी लुटीनंतर गाड्या बदलत, बनावट नंबर प्लेट वापरल्या. तसेच सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची देखरेख नसलेल्या किंवा अगदी कमी असेल अशा ठिकाणी रोख रकमेच्या पेट्या बदलण्याचे काम त्यांनी केले. बेंगळुरू शहराच्या मध्यवर्ती भागातून दिवसाढवळ्या कॅश व्हॅन लुटणाऱ्या चोरट्यांना शोधण्यासाठी पोलिसांनी मोठी मोहीम सुरू केली होती. आरोपींनी वाहने बदलत आणि कॅश ट्रान्सफर करत पोलिसांपासून वाचण्याचा प्रयत्न केला होता, अशी माहिती समोर आली आहे.

**कागदपत्र व्हेरिफाय करायचे म्हणून कॅश व्हॅन थांबवली**

हा दरोडा बुधवारी १९ नोव्हेंबर रोजी दुपारी पडला होता. ६ पुरुष एका एसयूव्हीमधून आले. त्यांनी रोख रक्कम घेऊन जाणारी कॅश व्हॅन रस्त्यातच थांबवली. हे पैसे बँकेच्या शाखांमध्ये नेले जात होते, असे बंगळुरूचे पोलीस आयुक्त सीमांत कुमार सिंग यांनी सांगितले. दरोड्याचा हा प्रकार वर्दळीच्या ठिकाणी घडला. या व्हॅनमध्ये १ चालक, १ कॅश कस्टोडियन आणि २ सशस्त्र सुरक्षा रक्षक होते. दरोडेखोरांनी व्हॅनमधील कर्मचाऱ्यांना ते भारतीय रिझर्व्ह बँकेचे अधिकारी असल्याचे सांगितले. इतक्या मोठ्या रकमेची वाहतूक करण्यासाठी त्यांच्याकडे असलेल्या कागदपत्रांची तपासणी करायची असल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलीस म्हणाले, की दरोडेखोरांनी कॅश कस्टोडियन आणि सुरक्षा रक्षकांना त्यांची शस्त्रं व्हॅनमध्ये ठेवून एसयूव्हीमध्ये बसण्यास सांगितले. तर चालकाला रोख रकमेसह गाडी चालवण्याची सूचना दिली. दरोडेखोरांनी काही किलोमीटर एसयूव्ही कॅश व्हॅनच्या मागे चालवली. नंतर त्यांनी चालकाला व्हॅनमधून बाहेर काढले. कॅश कस्टोडियन आणि सुरक्षा रक्षकाला एसयूव्हीमधून उतरविले. बंदुकीचा धाक दाखवत कॅश ताब्यात घेतली आणि त्यांनी तेथून पलायन केले. त्या भागात सीसीटीव्ही कमी होते. दरोडेखोरांनी या दरोड्यात एकापेक्षा जास्त वाहनांचा वापर केला होता का? याचा तपास पोलीस करत आहेत. रोख रकमेची वाहतूक करणाऱ्या कंपनीने पोलिसात तक्रार नोंदवली होती.

### ‘गव्हर्नमेंट ऑफ इंडिया’चे स्टिकर आणि बनावट नंबर प्लेट

दरोड्यात वापरलेल्या एसयूव्हीवर बनावट नंबर प्लेट होती. त्यावर ‘भारत सरकार’ असे स्टिकर होते, अशी माहिती पोलीस अधिकाऱ्यांनी बीबीसीला दिली. रोख रकमेची वाहतूक करणाऱ्या कंपनीच्या कर्मचाऱ्यांचा या दरोड्याशी काही संबंध आहे का, या दृष्टीनेही पोलीस तपास करत आहेत. दरोड्यात वापरलेली एसयूव्ही पोलिसांनी जप्त केली असल्याची माहिती कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी पत्रकारांना दिली. मात्र, गृहमंत्री जी. परमेश्वर यांनी संशयितांनी पळून जाण्यासाठी कोणते वाहन वापरले हे अद्याप स्पष्ट झाले नसल्याचे सांगितले.दरोडेखोरांनी गाडी बदलून पैसे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेले, हे तपासणीत निष्पन्न झाले आहे, असेही त्यांनी पत्रकारांना सांगितले. पोलीस यापूर्वी झालेल्या मोठ्या बँकांच्या दरोड्यांप्रमाणे या प्रकरणाचाही छडा लवकरच लावतील, याबद्दल खात्री असल्याचा विश्वास गृहमंत्री जी. परमेश्वर यांनी व्यक्त केला.दरम्यान, मे महिन्यात, विजयपुरा जिल्हा बँकेतून लॉकरची बनावट चावी वापरून ५३२.६ कोटी रुपयांचे ५९ किलो सोने चोरीला गेले होते. पोलिसांनी त्यापैकी ३९ किलो सोने आणि काही रोख रक्कम जप्त केली आहे. तसेच दोन माजी कर्मचाऱ्यांसह १५ जणांना अटक केली आहे.



## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

बातमीसाठी संपर्क :
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

जाहिरातीसाठी संपर्क :
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

वाचा...! ग्लोबल महातेज
अंक मिळविण्यासाठी संपर्क :
7588813540
9850576058

# मोदी सरकारचा सक्त आदेश...!

## सर्व स्मार्टफोनमध्ये आता असणार सरकारी ॲप

### इच्छा असूनही ॲप डिलीट करणे होईल अशक्य

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारत सरकारने सर्व मोबाईलमध्ये सायबर सुरक्षा ॲप ‘संचार साथी’ प्री-इन्स्टॉल करण्याचे आदेश दिले आहेत. हे ऍप डिलिट करता येणार नाही. या ॲपमुळे चोरीला गेलेले मोबाईल शोधण्यात मदत होते. नवीन मोबाईलमध्ये हे ॲप ९० दिवसात इन्स्टॉल करावे लागेल. भारत सरकारने एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. प्रत्येक मोबाईलमध्ये सरकारी सायबर सेफ्टी ऍप इन्स्टॉल करण्याच्या सूचना सरकारने दिल्या आहेत.

हे ऍप मोबाईल वापरकर्त्यांना डिलिट करता येणार नाही, याची काळजी मोबाईल कंपन्यांना घ्यायची आहे. भारतीयांना त्यांच्या मोबाईलमध्ये लवकरच एक सरकारी ऍप प्री-इन्स्टॉल असलेले दिसेल. भारत सरकारच्या दूरसंचार मंत्रालयाने स्मार्टफोन निर्मिती करणाऱ्या कंपन्यांना या संदर्भात आदेश दिले आहेत.

मोबाईलमध्ये सायबर गुन्ह्यांपासून सुरक्षा देणारे सरकारी ऍप इन्स्टॉल करा. हे ऍप डिलिट करता येणार नाही, याची काळजी घ्या, अशा सूचना मंत्रालयाकडून देण्यात आल्या आहेत. मात्र मंत्रालयाने अद्याप तरी याबद्दल कोणतीही अधिकृत माहिती दिलेली नाही. भारतातील मोबाईल वापरकर्त्यांची संख्या ११२ कोटी रूपयांच्या घरात जाते. भारत जगातील सर्वात मोबाईल निर्माता आहे. भारत सरकारकडे संचार साथी ऍप आहे. हे सरकारी ऍप मोबाईलचे सायबर धोक्यांपासून सुरक्षा देते.

मोबाईलची चोरी रोखण्यात, बोगस फोन काळ्या बाजारात विकण्यापासून रोखण्याचे काम संचार साथी ऍप करते. सरकारने दिलेल्या आकडेवारीनुसार, या ऍपच्या मदतीनं आतापर्यंत चोरीला गेलेले किंवा हरवलेले ७ लाख मोबाईल सापडलेले आहेत. यातील ५० हजार मोबाईल एकट्या ऑक्टोबरमध्ये परत मिळाले आहेत. दूरसंचार विभागानं 2023 मध्ये संचार साथी ऍप लॉन्च केले होते. सरकारने २८ नोव्हेंबरला आदेश काढला आहे. रॉयटर्स वृत्तसंस्थेनं याबद्दलचे वृत्त दिले आहे. नवीन ऍप इन्स्टॉल करण्यासाठी कंपन्यांना ९० दिवसांचा अवधी देण्यात आला आहे. संचार साथी ऍप नव्या मोबाईलमध्ये प्री इन्स्टॉल असेल याची खात्री मोबाईल कंपन्यांना करावी लागेल. हे ॲप डिसेबल किंवा डिलिट करता येणार नाही, याची काळजी देखील कंपन्यांना घ्यावी लागेल. जे स्मार्टफोन आधीपासूनच वापरात आहेत. त्या मोबाईलमध्ये संचार साथी ॲप इन्स्टॉल व्हावे यासाठी मोबाईल कंपन्यांना एक सॉफ्टवेअर अपडेट द्यावे लागेल. यानंतर वापरकर्त्यांच्या मोबाईलमध्ये संचार साथी ऍप इन्स्टॉल होईल. ॲपल कंपनी त्यांच्या स्मार्टफोनमध्ये स्वतः चे ॲप्सची प्री इन्स्टॉल करते. सरकारी किंवा कोणतेही थर्ड पार्टी ॲप आयफोनमध्ये इन्स्टॉल करायचे नाहीत. असे ॲपलचे धोरण आहे. ॲपल, गुगल, सॅमसंग, शाओमी यांनी अद्याप तरी यावर कोणतीही जाहीर भूमिका घेतलेली नाही.



# सोन्यात पाच लाख रुपये गुंतविले, तर पाच वर्षांनी किती परतावा मिळेल?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

या वर्षी सोन्याच्या किंमतीत प्रचंड वाढ झाली आहे. एप्रिलमध्ये प्रति १० ग्रॅम १ लाख रुपयांचा विक्रमी उच्चांक गाठला आहे. त्यानंतर सोन्याने वारंवार नवीन उच्चांक गाठले आहेत. २०२५मध्ये सोने हे स्टॉक किंवा इतर गुंतवणूक साधनांपेक्षा सर्वाधिक पसंतीची गुंतवणूक बनले आहे. सद्यस्थितीत सोन्यामध्ये ५ लाख रुपयांची गुंतवणूक केली तर पुढील पाच वर्षांत, म्हणजे २०३० पर्यंत त्यांना किती परतावा मिळू शकतो? जाणून घेऊयात सविस्तर माहिती.



**सोन्याच्या दरात सतत वाढ**

लग्नाच्या हंगामात मागणी वाढल्यामुळे मंगळवार, दि. २५ रोजी दिल्ली सराफा बाजारात सोन्याचे दर ३ हजार ५०० रुपयांनी वाढून प्रति १० ग्रॅम १ लाख २८ हजार ९०० रुपयांवर पोहोचले. गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या घसरणीच्या ट्रेंडला तोड देत ९९.५ टक्के शुद्ध सोन्याच्या किंमतीत ३ हजार ५०० रुपयांची वाढ होऊन ते प्रति १० ग्रॅम १ लाख २८ हजार ३०० रुपये झाले.
चांदी ५ हजार ८०० रुपयांनी वाढून प्रति किलोग्रॅम १ लाख ६० हजार ८० रुपये (करांसह) झाली. व्यापाऱ्यांच्या मते, लग्नाच्या हंगामात स्थानिक ज्वेलर्सकडून मागणी वाढल्यामुळे किमती वाढल्या.

**किंमती का वाढत आहेत?**

जागतिक आणि देशांतर्गत आर्थिक परिस्थितीत सतत बदल होत आहेत. गुंतवणूकदारांचा सोन्यात रस वाढला आहे. महागाई, जागतिक अस्थिरता आणि आर्थिक अनिश्चितता सोन्याच्या मागणीला आणखी चालना देत आहेत. म्हणूनच २०३० पर्यंत ५ लाख रुपयांच्या विद्यमान गुंतवणुकीवर संभाव्य परताव्याबाबत चर्चा तीव्र झाल्या आहेत. २००० ते २०२५ पर्यंत सोन्याचा चक्रवाढ वार्षिक वाढ दर (सीएजीआर) सुमारे १४ टक्के होता. या २५ वर्षांत २०१३, २०१५ आणि २०२१ या तीन वर्षांतच किमतीत घट झाली आहे.

**सोने एक नवीन विक्रम गाठू शकते**

२५ वर्षांपूर्वी २००० मध्ये २४ कॅरेट सोन्याची किंमत प्रति १० ग्रॅम ४ हजार ४०० रुपये होती, जी आता सुमारे १. २५ लाख रुपये प्रति १० ग्रॅम झाली आहे. २००० ते २०२५ दरम्यान, सोन्याच्या किमतीत सरासरी वार्षिक २५ टक्के ते ३५ टक्के वाढ झाली आहे. बाजारातील तज्ज्ञांचा असा विश्वास आहे, की भविष्यात सोने मजबूत परतावा देत राहील. याचा अर्थ असा, की आज ५ लाख रुपयांचे सोने खरेदी केले तर त्याचे पैसे २०३० पर्यंत जवळजवळ दुप्पट होऊ शकतात. अनेक अहवालांचा अंदाज आहे, की सध्याचा वाढता कल असाच राहिला तर २०३० पर्यंत सोने प्रति १० ग्रॅम २ लाख ५० हजार रुपयांपर्यंत पोहोचू शकते. काही अहवालांचा असाही दावा आहे, की २०३० पर्यंत १० ग्रॅम सोन्याची किंमत ७ लाख ते ७. ५ लाख रुपयांपर्यंत पोहोचू शकते. जागतिक अनिश्चितता अशीच राहिली, तर सोन्याच्या किंमती वेगाने वाढत राहतील. गुंतवणूकदारांना चांगले परतावे मिळण्याची शक्यता अधिक मजबूत होईल.

ग्लोबल महातेज
आजच...! आपली जाहिरात बुक करा
दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास
‘ चमकण्याची ’ तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!





रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!! डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १) | पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) | अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) | पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) | 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) | 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) | 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) | ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) | शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) | लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) | उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234
वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.




# वर्षातील अंतिम पौर्णिमेवर पडली भद्रेची छाया

## कधी करावे स्नान-दान? जाणून घ्या शुभ मुहूर्त

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मार्गशीर्ष (अग्रहायण) महिना भगवान श्रीकृष्णांनी श्रेष्ठ असल्याचे सांगितले आहे. या महिन्यातील अमावास्येला मार्गशीर्ष अमावास्या म्हणतात. ही तिथी पितरांना तर्पण देण्यासाठी, देवतांची कृपा मिळविण्यासाठी, कर्मशुद्धी करण्यासाठी आणि जीवनातील अडचणी दूर करण्यासाठी अत्यंत फलदायी मानली जाते.

### मार्गशीर्ष पौर्णिमेचे महत्त्व

हिंदू धर्मानुसार मार्गशीर्ष पौर्णिमेला विशेष धार्मिक आणि शुभ मान्यता आहे. असे मानले जाते, की या दिवशी चंद्रदेव आपल्या संपूर्ण सोळा कलांसह पूर्णत्व प्राप्त करतात. चंद्राची ही पूर्णता पृथ्वीच्या वातावरणात सकारात्मक ऊर्जा आणते. त्यामुळे या दिवशी पूजा, दान आणि सर्व धार्मिक कार्यांसाठी अत्यंत शुभ काळ मानला जातो. मार्गशीर्ष पौर्णिमेच्या दिवशी चंद्रदेव आणि भगवान विष्णू यांच्या उपासनेचे विशेष महत्त्व आहे. शास्त्रानुसार या पवित्र तिथीला केलेल्या पूजेमुळे जीवनातील दुःख-कष्ट दूर होतात, अडथळे कमी होतात आणि मानसिक शांती व आध्यात्मिक ऊर्जा प्राप्त होते. यावर्षीच्या मार्गशीर्ष पौर्णिमेला भद्रेची छाया देखील राहणार आहे. भद्रा लागल्यास काही शुभ कार्यांबाबत सावधगिरी बाळगावी लागते.

### मार्गशीर्ष पौर्णिमा २०२५ कधी आहे?

ज्योतिषीय गणनेनुसार पूर्णिमा तिथी प्रारंभ
४ डिसेंबर २०२५ : सकाळी ८ : ३६ वाजता

### पौर्णिमा तिथी समाप्ती

५ डिसेंबर २०२५ : सकाळी ४ : ४२ वाजता
उदयतिथीचा स्वीकार केला जातो. त्यामुळे मार्गशीर्ष पौर्णिमा व्रत, पूजा आणि स्नान-दान ४ डिसेंबर २०२५ (गुरुवार) या दिवशीच साजरे केले जाईल.

### मार्गशीर्ष पौर्णिमा २०२५ वरील भद्रेचा प्रभाव

पंचांगानुसार २०२५ च्या मार्गशीर्ष पौर्णिमेला भद्रा सकाळी ८:३६ वाजता आरंभ होईल. साधारणपणे भद्रा काल अशुभ मानला जातो. त्यावेळी शुभ कार्य टाळले जातात. पण यावर्षीची स्थिती वेगळी आहे.

### महत्त्वपूर्ण बाबी

२०२५ च्या मार्गशीर्ष पौर्णिमेला भद्रा पृथ्वी लोकात (मृत्यूलोक) नसून स्वर्गलोकात राहील. म्हणून पृथ्वीलोकातील शुभ कार्यांवर भद्रेचा कोणताही परिणाम पडणार नाही. भद्रा केवळ पृथ्वीलोकात असल्यास कामात अडथळे, अशुभ परिणाम किंवा विघ्ने निर्माण करते.

### स्नान-दान व पूजेसाठी शुभ मुहूर्त

धार्मिक क्रिया व वेळ
स्नान-दानाचा मुहूर्त : सकाळी ५ : १० ते ६ : ०४
सत्यनारायण पूजेचा मुहूर्त : सकाळी १०:५३ ते दुपारी १:२९
चंद्रोदय (चंद्र उगवणे) : दुपारी ४:३४ वाजता.
या दिवशी स्नान-दान, जप-तप, सत्यानारायण कथा, चंद्र आणि भगवान विष्णूंची विशेष पूजा अत्यंत फलदायी मानली जाते.

# आपण दत्त नाम का घेतो?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मुळात आपण अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त असे का म्हणतो? आपण जेव्हा संकटात असतो आणि इतर सर्व मार्ग बंद होतात तेव्हा आपण श्री दत्त महाराजांचे स्मरण करतो. आता दत्त महाराजांचेच स्मरण का? तर दत्त महाराज स्मर्तृगामी आहे.

**स्मर्तृगामी म्हणजे काय?**

स्मरण करताच तत्काळ आपल्या मदतीसाठी धावून येणारे तत्त्व म्हणजे स्मर्तृगामी. जगात अन्य कुठल्याही तत्त्वाला स्मर्तृगामी म्हणत नाही. म्हणून दत्त महाराज हे लवकर पावणारे दैवत आहे. काही जण विचारतील, की आम्ही कुणाची सेवा करु? तर याचे उत्तर खूप सोपे आहे. ज्या देवतेचे स्मरण करताच तुम्हाला शहारे आले. डोळ्यांत अश्रू आले. तुमच्या अपूर्णतेला एक प्रकारची पूर्णत्वाची जाणीव झाली, तर समजून घ्या की त्या देवतांची आराधना तुम्ही करावी. दत्त महाराज आणि स्वामी महाराज एकच आहेत.

श्रीपाद श्रीवल्लभ चरित्रामृत किंवा स्वामी चरित्र सारामृतमध्ये याचा उल्लेख आहेच. पण आताच्या काळातसुद्धा त्याची प्रचिती पदोपदी येते. आपल्यासारख्या सामान्य सेवेकऱ्याला या महावाक्याचा अर्थ कळणार नाही पण ज्याप्रमाणे भगवान परशुराम आणि प्रभू श्रीरामचंद्र हे भगवान विष्णू यांचा अवतार असूनही त्यांचे कार्य क्षेत्र वेगळे होते, पद्धत वेगळी होती. ज्याप्रमाणे ताक, दही, लोणी, तूप हे दुधापासून तयार होतात त्याप्रमाणे दत्त महाराज आणि स्वामी महाराज हे एकच आहेत.

आपण जेव्हा अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त किंवा श्री स्वामी समर्थ म्हणतो. आपण तेव्हा दत्त महाराजांचे स्मरण करतो, चिंतन करतो. जेव्हा आपण दत्तप्रभूंचे चिंतन करतो तेव्हा कुठलीही चिंता आपल्याला भेडसावत नाही. श्री स्वामी समर्थ महाराजांच्या सेवेने सर्व देवी-देवतांच्या सेवेचे फळ मिळते. पावसाचे पाणी सर्व नद्यांद्वारे हे समुद्रात जाऊन मिळते त्याप्रमाणे सर्व देवी-देवतांची केलेली सेवा ही महाराजांच्या चरणी रुजू होते. पितृ दोष असेल, कुंडलीमध्ये दोष असेल, वास्तू दोष असेल, तर जगातील कुठलीही समस्या महाराजांच्या सेवेने दूर होते. एवढेच नव्हे, तर प्रपंच्यामधील अडचणी दूर करण्यासाठी, आत्मिक प्रगतीसाठी दिवसातून एकदा तरी अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त अंतःकरणपूर्वक म्हणावे.

# औदुंबर : दत्त महाराजांचा प्रिय कल्पवृक्ष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दत्त महाराजांना औदुंबर वृक्ष अत्यंत प्रिय आहे. दत्तभक्तांमध्ये औदुंबरतळी त्यांचा वास असल्याची श्रद्धा आहे. अनेक पुण्यवृक्ष असताना दत्त महाराजांना औदुंबराबद्दल विशेष प्रेम का आहे ? श्री गुरुचरित्राच्या एकोणविसाव्या अध्यायात श्री नृसिंह सरस्वती यांनी औदुंबराचे महात्म्य आणि श्री नृसिंह अवताराशी त्याचा नेमका काय संबंध आहे, ते स्पष्ट केले आहे.

### औदुंबर आणि श्री नृसिंह अवतार

हिरण्यकश्यपू नावाचा दैत्य ब्रह्मदेवाच्या वरामुळे अजिंक्य झाला होता. त्याला कोणत्याही देव, दानव किंवा मानवाकडून घरात किंवा बाहेर कोणत्याही ठिकाणी मृत्यू येणार नाही, असा वर मिळालेला होता. त्याचा पुत्र प्रल्हाद हा विष्णूभक्त होता. ज्यामुळे हिरण्यकश्यपूने त्याला अनेकदा मारण्याचा प्रयत्न केला. मात्र प्रल्हादाच्या भक्तीमुळे तो प्रत्येकवेळी सुखरूप बचावला. हिरण्यकश्यपूने प्रल्हादाला विचारले, की तुझा तो रक्षक देव कुठे आहे? प्रल्हाद म्हणाला, की तो चराचरात सर्वत्र आहे. अगदी या खांबातही. हे ऐकून हिरण्यकश्यपूने खांबाला लाथ मारली. तेव्हा कडाड आवाजासह श्री विष्णू नृसिंह अवतारात प्रकट झाले. त्यांनी हिरण्यकश्यपूला उंबरठ्यावर मांडीवर घेऊन आपल्या तीक्ष्ण नखांनी त्याचे पोट फाडून त्याचा वध केला. हिरण्यकश्यपूच्या शरीरातील कालकूट विष नृसिंहाच्या नखांमध्ये शिरले. ज्यामुळे त्यांच्या नखांना प्रचंड दाह जाणवू लागला. तेव्हा महालक्ष्मीने औदुंबराची पिकलेली फळे आणली आणि श्री नृसिंहांना ती फळे नखांनी खुपसण्यास सांगितले. यामुळे नखांमधील दाह शांत झाला आणि उग्र नृसिंह शांत झाले.



### औदुंबराला कल्पवृक्षाचा दर्जा

या घटनेनंतर श्री विष्णूंनी औदुंबर वृक्षाला आशीर्वाद देत म्हटले, की हे औदुंबर, तू सदा फलद्रूप राहशील. तुझे नाव ‘ कल्पवृक्ष ’ म्हणून प्रसिद्ध होईल. तुझी भक्तीपूर्वक सेवा करणाऱ्यांच्या सर्व मनोकामना पूर्ण होतील. तुझे दर्शन घेताच उग्र विष शांत होईल. जे तुझी सेवा करतील त्यांना संततीप्राप्ती, संपत्ती आणि दुःख निवारण होईल. श्री गुरुचरित्रात या आशीर्वादाचे वर्णन असे आहे, की

तये समयीं औदुंबरासी देती वर हृषीकेशी। सदा
फळित तूं होसी। ‘कल्पवृक्ष’ तुझे नाम ॥
जे जन भजती भक्तीसी। काम्य होय त्वरितसी। तुज
देखतांचि उग्र विष शांत होय ॥
वांझ नारी सेवा करिता। पुत्र होतील तिसी त्वरिता।
जे नर असतील दैन्यपीडिता। सेविता होतील
श्रियायुक्त ॥
तुझी छायीं बैसोन। जे जन करिती जपानुष्ठान। अनंत
फळ होय ज्ञान। कल्पिलें फळ होय त्यांसी ॥
तुज सेविती त्या नरासी। व्याधि नव्हती कवणे
दिवसी। ब्रह्महत्यादि महादोषी। परिहार होती
परियेसा ॥
ऐसा वृक्ष औदुंबर। कलियुगीं तोचि कल्पतरू।

श्री नृसिंह सरस्वती जे स्वतः नृसिंह अवताराचे रूप होते. नृसिंह मंत्राची उपासना औदुंबराखाली बसून करत. त्यांना औदुंबराची शीतलता प्रिय होती. त्यामुळेच दत्त पंथात औदुंबराला विशेष स्थान आहे.

### औदुंबर प्रदक्षिणेचे महत्त्व

औदुंबर वृक्षाची प्रदक्षिणा करण्याचे अनेक आध्यात्मिक आणि शारीरिक फायदे आहेत. त्यात मन:शांती आणि एकाग्रता, नियमित प्रदक्षिणेमुळे विचलित मन शांत होऊन एकाग्रता वाढते. ज्यामुळे आध्यात्मिक प्रगती सुलभ होते.

### दत्त महाराजांचा आशीर्वाद

औदुंबराच्या बुडाशी श्री नृसिंह सरस्वती यांचा वास आहे. त्यामुळे प्रदक्षिणा केल्याने दत्त महाराजांचे आशीर्वाद प्राप्त होतात.

बाधा आणि रोगनिवारण

हृदयविकार आणि बाह्य बाधांवर औदुंबर प्रदक्षिणा रामबाण उपाय आहे.

### अशक्य कार्य सिद्धी

औदुंबर हा कल्पवृक्ष आहे. श्रद्धेने संकल्प करून प्रदक्षिणा केल्यास अडलेली कामे पूर्ण होतात.

**प्रदक्षिणेची पद्धत :** किमान १२ मिनिटे प्रदक्षिणा करावी.

### औदुंबर : भूतलावरील कल्पवृक्ष.

औदुंबराला कल्पवृक्षाचा दर्जा त्याच्या दैवी उत्पत्तीमुळे मिळाला. श्री नृसिंहाच्या नखांमधील विष शांत करणारा हा वृक्ष भक्तांच्या सर्व इच्छा पूर्ण करतो. त्याच्या सावलीत जप, तप आणि साधना केल्यास अनंत पुण्यप्राप्ती होते. त्याची सेवा केल्याने संततीप्राप्ती, रोगनिवारण आणि संपत्ती प्राप्त होते. औदुंबराखाली दत्त महाराजांचे नामस्मरण करा, प्रदक्षिणा घाला आणि कल्याण प्राप्त करा.

# गुरुदत्त महाराजांचे चोवीस गुरू

**१) सूर्य :** ज्याप्रकारे सूर्य एकच असून, वेगवेगळ्या माध्यमांतून वेगवेगळ्या रूपांत दिसतो. तसेच आत्माही एकच आहे. परंतु त्याची अनेक रूपे पाहावयास मिळतात. तसेच सूर्य जलाचा संचय करून परोपकारार्थ त्याचा भूमीवर वर्षाव करतो. त्याप्रमाणे मनुष्याने उपयुक्त संचय करून सर्वांना त्यांचा लाभ द्यावा.



**२) पृथ्वी :** पृथ्वीकडून आम्ही सहनशीलता व परोपकाराची भावना शिकू शकतो.



**३) पिंगला वेश्या :** भगवान दत्त यांनी पिंगला नावाच्या वेश्याकडून ही शिक्षा घेतली आहे, की केवळ पैशासाठी जगू नये. धनाच्या कामनेत जेव्हा ती एक रात्री कंटाळली तेव्हा अचानक तिच्या मनात वैराग्य आले. तेव्हा तिला जाणीव झाली, की खरे सुख पैशात नाही, तर परमात्म्याच्या ध्यानात आहे. तेव्हा कुठे जाऊन ती सुखाची झोप घेऊ शकली.



**४) कबूतर :** देवाने जेव्हा बघितले, की कबुतराचे जोडपे आपल्या मुलांना जाळेत अडकलेले बघून स्वतःही जाळेत जाऊन फसले, तेव्हा ही शिक्षा मिळाली की अतिस्नेह दुःखाचे कारण असते.



**५) वायू :** जसे जागा चांगली असो या वाईट. वायूचे मूल रूप स्वच्छताच आहे. तसेच आमच्यासोबत चांगले लोक असो वा वाईट आम्हाला आपला चांगुलपणा सोडायला नको.



**६) मृग :** मृग आपल्या मस्तीत क्षुब्ध होऊन इतका धुंद होऊन जातो, की त्याला मस्तीत तो आपले प्राण परस्वाधीन करतो. याने ही शिक्षा मिळते की कधीच मोहात अडकून बेपर्वा होऊ नये.



**७) समुद्र :** समुद्राच्या लाटा निरंतर गतिशील असतात. तसेच जीवनातील चढ-उतारात आम्हाला खूश आणि गतिशील राहायला हवे.



**८) पतंग :** जसे पतंग आगीकडे आकर्षित होऊन जळून जातो. तसेच रंग-रूपाच्या आकर्षण आणि खोट्या मोहात अडकले न पाहिजे.



**९) हत्ती :** जसे काष्ठाच्या हत्तीणी सन्निध येण्यासाठी हत्ती विषयसुख लालसेने लुब्ध होऊन खड्ड्यात पडतो आणि सहजपणे मनुष्याच्या हातात सापडतो. त्यापासून हे शिकण्यासारखे आहे, की तपस्वी पुरुषाने आणि संन्यासी स्त्रीने दूर राहिले पाहिजे.



**१०) आकाश :** प्रत्येक परिस्थिती आणि काळात मोहापासून दूर राहण्याची शिक्षा आकाशाकडून मिळते.



**११) पाणी :** मनुष्याने पाण्याप्रमाणे नेहमी मधुर आणि पवित्र राहावे.



**१२) मधमाशी :** मधमाशी पुष्कळ कष्ट करून पोळे बनवून त्यात मध साठवते. परंतु एक दिवस मधुहा अचानक येऊन पोळ्यासह मध घेऊन जातात. याने शिक्षा मिळते, की आवश्यकतेहून अधिक संचय करणे योग्य नाही.



**१३) मत्स्य :** लोखंडाच्या गळाला मांस पाहून जशी मासोळी भुलल्यामुळे मांस खायले जाते आणि आपल्या प्राणास मुकते. त्याचप्रमाणे आम्हाला जिव्हेच्या स्वादाला अधिक महत्त्व द्यायला नको. आरोग्याच्या दृष्टीने योग्य आहार घ्यावा.



**१४) टिटवी :** ज्याप्रकारे एक टिटवी चोचीत मासा धरून असते आणि ते पाहून इतर पक्षी ते मास हिसकावण्याचा प्रयत्न करतात, आणि शेवटी माशाचा तुकडा सोडल्यावरच तिला शांती मिळते. तसेच आम्हाला स्वतःकडे अधिक वस्तू संचय करून ठेवण्याचा अट्टाहास करायला नको.



**१५) बालक :** जशी लहान मुले चिंतामुक्त आणि प्रसन्न दिसतात तसेच आम्हाला चिंतामुक्त आणि नेहमी प्रसन्न राहण्याचा प्रयत्न करायला हवा.



**१६) अग्नी :** परिस्थिती कशीही असो. त्या परिस्थितीत स्वतःला समायोजित करणे योग्य ठरते.



**१७) चंद्र :** जसे चंद्राला अमावास्या आणि पौर्णिमा आल्यावरही अर्थात कलेत उणे-अधिकपणा असून त्याचा विकार त्याला बाधक होत नाही. तसेच आत्म्यास देहासंबंधीचे विकार बाधक होत नाहीत.



**१८) कुमारिका :** देवाने बघितले की एकदा एक कुमारिका धान्य कुटत होती. तेव्हा तिच्या हातात असलेल्या बांगड्यांच्या आवाजामुळे बाहेर बसलेले पाहुणे परेशान होत होते. बांगड्यांचा आवाज बंद करण्यासाठी तिच्या बांगड्या फोडून दिल्या गेल्या आणि दोन्ही हातांत केवळ एक-एक बांगडी राहू दिली. नंतर कुमारिकेने आवाज केल्याविना धान्य कुटून घेतले अर्थात आम्हालाही एका बांगडीप्रमाणे एकटे आणि निरंतर वाढत राहण्याची प्रवृत्तीसह जगायला हवे.



**१९) तीर तयार करणारा कारागीर :** दत्त महाराजांनी एक असा तीर बनविणारा बघितला जो आपल्या कामात एवढा मग्न होता, की त्याच्याजवळून राजाची स्वारी निघून गेली तरी त्याचे कामावरून लक्ष वेधीत झाले नाही. अतः आम्हाला अभ्यास आणि वैराग्याने मनाला वश करावे.



**२०) साप :** देवाने सापाकडून हे शिकले की संन्याशासारखे जगावे. जसे दोन साप कधीही एकत्र फिरत नाही तसेच दोन बुद्धिमत्तांनी कधीही एकत्र फिरू नये. कोणत्याही एका जागेवर न थांबता इकडे-तिकडे विचरण करत ज्ञानाचा प्रसार करावा.



**२१) कोळी :** कोळी तंतूने घर बनवून त्यात क्रीडा करतो आणि त्या घरास गिळून मोकळा होता. तसेच परमेश्वर मायेने सृष्टीची रचना करतो आणि मनास येईल तेव्हा नाश करतो. अर्थातच जगातील घटनांना अधिक महत्त्व देऊ नये.



**२२) भ्रमरकीट :** भ्रमराचे ध्यान करणारा किडा जसा स्वतः भ्रमरपणाला पावतो तसेच एकनिष्ठपणे परमात्म्याचे चिंतन करणारा त्याला पावतो. सूर्यविकासी कमळे सूर्य मावळताच मिटतात. अशावेळी भ्रमर त्यावर आरूढ असला म्हणजे कमळाच्या पोटात बंधन पावतो. यावरून ‘ विषयासक्तीने बंधन प्राप्त होते ’, हे जाणून विषयांत आसक्ती बाळगू नये.



**२३) भुंगा :** याच्याकडून देवाने शिकले की जेथे सार्थक गोष्टी शिकायला मिळतील त्या तत्काल ग्रहण कराव्यात. ज्याप्रकारे भुंगा वेगवेगळ्या फुलांतून पराग घेतो.



**२४) अजगर :** अजगराकडून हे शिकायला मिळाले की जीवनात संतोषी बनून राहावे. जे मिळेल ते सुखसमाधाने स्वीकार करणेच आपला धर्म समजावे.



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**




नरसोबाची वाडी येथे दुसरे दत्तावतार नृसिंह सरस्वती १२ वर्षे तपश्चर्येला होते. तेथे त्यांच्या मनोहर पादुका आहेत. नरसिंहवाडी म्हणजेच नरसोबाची वाडी हे दत्तात्रय महाराजांचे एक जागृत असे देवस्थान असून, कृष्णामाईच्या तीरावर वसलेले आहे. सांगलीपासून २५ किलोमीटरवर असणारे हे गाव म्हणजे साक्षात दत्तभूमीच. ही भूमी श्री दत्त महाराजांचे अवतार असलेल्या नरसिंह सरस्वतींच्या १२ वर्षे वास्तव्याने पावन झालेली आहे. पुण्याहून सांगलीला जाणाऱ्या बसमधे बसले की शेवटचा स्टॉप म्हणजे नरसोबाची वाडी. मंदिराचा आवार खूप मोठा आहे. प्रवेशव्दारातून आत गेल्यावर सुरूवातीला डाव्या बाजूची दुकाने तुमचे स्वागत करतात. या दुकानांमधे पूजा साहित्य, प्रसाद आणि थोरा-मोठ्यांना वाचायला उपयुक्त अशी पुस्तके देखील मिळतात. येथे मिळणारे पेढे अतिशय चविष्ट असतात. येथील खासीयत म्हणजे कवठ बर्फी आणि ड्रायफ्रूट बर्फी या दोन प्रकारच्या बर्फी तुम्हाला दुसरीकडे कुठेच इतक्या छान मिळणार नाहीत. येथील बासुंदी तुम्ही एकदा चाखली की तिची चव तुम्ही कधीच विसरू शकणार नाहीत.

आत आल्यावर उजव्या बाजूला नारायणस्वामींचे मंदिर आहे. त्यामागे मोठी धर्मशाळा बांधलेली आहे. थोडेसे पुढे गेले, की डाव्या बाजूला मुख्य मंदिर आहे. जेथे औदुंबराच्या (झाडाच्या) सावलीमधे नरसिंह सरस्वती महाराजांच्या पादुका स्थापन केलेल्या आहेत. नरसिंह सरस्वती महाराजांनी नरसोबाची वाडी सोडण्यापूर्वी या जागी आपल्या मनोहारी पादुकांची स्थापना केली होती. ज्याचा पुढे श्री. गुळवणी महाराजांनी जीर्णोद्धार केला. त्यानंतर सद्यःस्थितीतील मंदिराची रचना झाली.

आता थोडी नजर वळवा. समोरच कृष्णामाईचे दुथडी भरून वाहणारे स्वच्छ, नितळ पाणी चकाकताना दिसेल. असे म्हणतात, की पूर्वी पावसाळ्यामधे कृष्णामाईला इतका पूर यायचा की पाणी मंदिरातील पादुकांना स्पर्श करीत असे. पण आजही कृष्णामाईच्या पात्राला पाणी अगदी काठोकाठ असते. नदीकाठी बांधलेल्या सुंदर घाटामुळे मंदिर परिसराला एक उठाव आलेला आहे.

नरसोबाच्या वाडीला मंदिरामध्ये सकाळी ९ ते १२ या वेळेत मनोहारी पादुकांची पूजा करण्याची संधी भाविकांना मिळते. मंदिराच्या उजव्या आणि डाव्या बाजूला दोन लहान खिडक्या बसविलेल्या आहेत. ज्यामधून पूजा करणाऱ्या व्यक्तीला पादुकांची होणारी पूजा व्यवस्थित बघता येते. तसेच मुख्य व्दारातून इतर भाविकांना दर्शन घेता येते. या तीर्थक्षेत्री असणारे ब्राह्मणवृंद आपल्याकडून यथासांग पूजा करवून घेतात. दुपारी १२ ते १ च्या सुमारास महापूजा, नैवद्य व आरती होते.